## *Appendix XIV (iv)*, (Vide Article - 14.02 (iii))

राज्यातील ४८ वन विभागाचे चराई जमाबंदी
अहवालास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक : एमएफपी-२१०३/प्र.क्र.१३५/फ-१
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ६.५.२००८

<u>वाचावे</u> : (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एमएफपी-१३६५/१३२२११-याप, दि.६.१२.६८.
(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एमएफपी-१३६९/६३६९५-झेड दि.२.८.१९७१.
(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एमएफपी-१३७१/१२७०३५-झेड दि.३.११.१९७३.
(४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक उत्पादन व व्यवस्थापन यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-१४/वनचराई/३९२, दि.२०.०३.२००४.
(५) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २३.१२.२००३.व दिनांक २१ मार्च, २००५
(६) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक : कक्ष -१६/आर-३/चराई जमाबंदी/३५६/०७-०८, दिनांक ८.६.२००७.
(७) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २९.१०.२००७
(८) शासन पत्र समक्रमांक दि.१८.१.२००८
(९) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक : कक्ष-१६/आर-३/च.ज.स्थ/ प्र.क्र.६६(०७-०८)/१५७५, दिनांक २७.२.२००८.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन पत्र समक्रमांक दि.१८.१.२००८ अन्वये शासन निर्णय समक्रमांक दिनांक २९.१०.२००७ च्या शासन निर्णयास दिलेली स्थगिती उठविण्यात येत आहे तसेच आता या शासन निर्णयान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक, यांनी त्यांचे दिनांक २७.०२.२००८ चे पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित केल्यानुसार राज्यातील ४८ वन विभागातील चराईजमाबंदी अहवालास मान्यता प्रदान करण्यात येत आहे व त्यानुसार राज्यातील अमरावती, पश्चिम मेळघाट, पूर्व मेळघाट, उस्मानाबाद, बीड, परभणी, अहमदनगर, पूर्व नाशिक, पश्चिम नाशिक, सोलापूर, भोर, पुणे, जुन्नर, ठाणे, जव्हार, शहापूर, रोहा, अलिबाग, डहाणु, मेवासी, यावल, जळगांव, भामरागड, ब्रम्हपुरी, चिपळूण, यवतमाळ, पांढरकवडा, या २७ वन विभागात चराई जमाबंदी अहवालानुसार मेंढी चराईसाठी वनक्षेत्र उपलब्ध करण्यात येत नाही व राज्यातील बुलढाणा, वर्धा, भंडारा, नागपूर, गोंदीया, औरंगाबाद, नांदेड, पश्चिम धुळे, उत्तर धुळे, सिरोंचा, आलापल्ली, मध्यचांदा,

गडचिरोली, वडसा, चंद्रपूर, सावंतवाडी, सातारा, कोल्हापूर, अकोला व सांगली आणि पुसद अशा एकुण २१ वन विभागात मेंढी चराईसाठी काही प्रमाणात क्षेत्र उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

खालील १ ते ३ मध्ये नमुद मुद्यांवर सर्व चराई जमाबंदी अहवालात पूर्तता करण्याच्या अधिन राहून उपरोक्त ४८ वन विभागातील चराई जमाबंदी अहवालास शासनाची सदर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(१) चराई जमाबंदी अहवाल मुंबई वन संहिता भाग ३, दिनांक ६.१२.१९६८ च्या शासन निर्णयानुसार तसेच संबंधित वन विभागाच्या कार्यआयोजनेनुसार असावे.

(२) संरक्षित वने, वृक्षाच्छादीत वन, गौण वने, चराईसाठी संरक्षित कुरणे असे क्षेत्राचे वर्गीकरणानुसार चराईची क्षमता निश्चित करण्यात यावी.

(३) मेंढीसाठी तरतूद करतांना सुध्दा मेंढीच्या चराई युनिट १ असून त्यानुसार मेंढी चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करुन द्यावे तसेच मुंबई वन संहिता भाग ३ मधील तरतुदीनुसार १५ सप्टेंबर ते १५ मे पर्यंत चराईची परवानगी देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शिरीष राणे)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक ,महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव),महाराष्ट्र राज्य, नागपूर
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)
उपविभागिय वन अधिकारी , भोर, चिपळूण, सांगली, बीड, उस्मानाबाद.
सर्व संबंधित चराई जमाबंदी अधिकारी.
वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.